<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. १५९/२०१९</u> **निशाणी क्र. ३४**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०२</u>**

**नाव** — ओमकार तुकाराम सहाणे,
**वय** — ३२, व्यवसाय— रचना सहाय्यक,
**राहणार**— संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.

**<u>पुढील सरतपास वादीतर्फे श्री. एस. एम. नवले अधिवक्ता</u>**

मी सिन्नर नगरपरिषदेमध्ये मे २०२५ पासुन नगर रचना विभागामध्ये रचना सहाय्यक म्हणुन कार्यरत आहे. माझे कर्तव्य सुचीमध्ये बांधकाम परवाना देणे, अनधिकृत बांधकामाबाबत सल्ला आणि मार्गदर्शन देणे ही कामे येतात. तसेच, रेखांकन परवानगी देणे हे देखील माझे कर्तव्य आहे. सन २०१९ साली रचना सहाय्यक पदावर कोण कार्यरत होते हे मी आजरोजी सांगु शकत नाही. वादी यांचे मुलाने नगरपरिषदेला नि. क्र. २४ आणि २५ अन्वये दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली हे मी सांगू शकत नाही.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास श्री. जी. सी. बर्के अधिवक्ता</u>**

सिटी सर्व्हे नं. ३२२७ ला परवानगी दिल्याचे मला दिसुन येत नाही. मला न्यायालयातील साक्षी समन्स प्राप्त झाल्यानंतर मी जागेवर जावुन इमारत पाहणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०१९ साली सिन्नर नगरपरिषदेमध्ये कार्यरत नसल्याने त्यावेळच्या कार्यवाहीबाबत मला सखोल माहिती नाही.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

माझे समक्ष

LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Digitally signed by LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Date: 2026.02.18 13:18:20 +0530

ठि. सिन्नर
दि. १८.०२.२०२६

**(श्री. लक्ष्मीकांत चं. वाडीकर)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सिन्नर.